स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ‘मानव्यविद्या’या शाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करण्यात येणा-या शोधप्रबंधाचा स्थूल आराखडा

शीर्षक

सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे : एक अभ्यास

संशोधक

लक्ष्मण दत्तात्रय खंडागळे

(एम.ए, बी.एड, नेट, सेट)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राजकुमार संतराम कांबळे

(सहाय्यक प्राध्यापक,श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय,लातूर.)

संशोधन केंद्र

इतिहास विभाग,

हुतात्मा गोविंद पानसरे महाविद्यालय, अर्जापूर,ता.बिलोली,जि. नांदेड.

मार्च,२०१८

सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळे : एक अभ्यास

आज २१ व्या शतकात पर्यटन व्यवसायास महत्त्व प्राप्त झालेले आहे.व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्या दृष्टीकोनातून पर्यटन महत्त्वाचे मानले गेले.परंतु काळाच्या ओघात पर्यटनाची व्याप्ती वरील घटकांपुरतीच मर्यादित न राहता आज ती वाढलेली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पर्यटन व्यवसायाचे महत्त्व ओळखून अनेक देशांनी पर्यटन व्यवसायाच्या विकासाला प्रोत्साहन दिले आहे. त्यामुळे आज पर्यटन व्यवसाय विकसीत होत आहे.

प्राचीन काळी भारतीय समाजात पर्यटन अस्तित्वात होते. भारतात सिंधु संस्कृतीपासूनच व्यापार, धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान इ. अनेक कारणांनी पर्यटन झाले आहे.मौर्यकालखंडात मॅगेस्थेनिस हा प्रवासी भारतात आला.सम्राट अशोकाने बौध्द भिक्खूंना भारतातील विविध भागात आणि भारताच्या शेजारील देशात बौध्दधर्माच्या प्रसारासाठी पाठविले होते. भारतीय धर्म, संस्कृती, शिक्षण, कला यांच्या अभ्यासासाठी अनेक परकीय पर्यटकांनी भारतात प्रवास केला. त्यामध्ये हुएन त्संग, इत्सिंग अल्बेरुनी इ.ची नावे सांगता येतील. भारतीय पर्यटनात प्राचीन काळापासून धार्मिक पर्यटनाला अन्यसाधारण महत्त्व आहे.कारण धार्मिक स्थळांना भेटी दिल्याने आत्मिक शांती प्राप्त होते.अशी भारतीयांची भावना आहे.धार्मिक स्थळांच्या ठिकाणी गेल्याने मोक्ष प्राप्ती होते, जीवनाचे साफल्य होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात भारतात धार्मिक पर्यटन केले जाते.

नैसर्गिक सौंदर्याची देणगी असलेल्या महाराष्ट्र राज्याला जवळपास ७२० कि.मी.लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे.सह्याद्री सारख्या उंच पर्वतरांगा या राज्यात असून या पर्वत रांगातून गोदावरी, कृष्णा आणि कावेरी या सारख्या नद्या उगम पावतात.एकूनच पर्यटनाच्या दृष्टीने राज्याला नैसर्गिक वारसा लाभला असून पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या अनेक ऐतिहासिक वास्तु आणि प्राचीन स्मारके राज्यात आहेत. इतकेच नाहीतर महाबळेश्वर, चिखलदरा, माथेरान, यासारखी थंड हवेची ठिकाणे आहेत. विविध नैसर्गिक धबधबे असून

राज्यातील व्याघ्र प्रकल्प (ताडोबा) अभयारण्ये (माळढोक) इ.स्वदेशी पर्यटकांबरोबर विदेशी पर्यटकांचे आकर्षणाची ठिकाणे आहेत.महाराष्ट्रातील रायगड, शिवनेरी, सिंधुदुर्ग, पन्हाळा, सिंहगड, यासारखे अनेक दुर्ग, अजंठा, वेरुळ, कार्ले, एलिफन्टा यासारखी प्राचीन लेणी आहेत. पशुपक्षी (वाघ, माळढोक, हरीण, गवे) यासारखे प्राणी, जायकवाडी, कोयना, राधानगरी, उजनी यासारखी धरणे व अनेक उद्याने आहेत हे पाहण्यासाठी पर्यटक येतात. शिर्डी, पंढरपूर, शेगाव, कोल्हापूर, तुळजापूर, गणपतीपुळे, भीमाशंकर, नाशिक ही धार्मिक स्थळे पर्यटकांना आकर्षित करतात.एकूणच सर्व घटकांमुळे राज्यातील पर्यटन विकसीत होत आहे.

महाराष्ट्रात पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सोलापूर जिल्ह्याला महत्त्वाचे स्थान आहे.सोलापूर जिल्ह्यास सातवाहन कालखंडापासुनची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली आहे.सोलापूर जिल्ह्याच्या भूप्रदेशाचा सातवाहन.चालुक्य, राष्ट्रकुट, यादव, बहामनी, निजामशाही, आदिलशाही, मोगलशाही, मराठे-पेशवे या सत्ताशी संबंध आलेला आहे.त्यामुळे सोलापूर जिल्ह्याची ऐतिहासिकता समृध्द झालेली आहे.यातून येथे धार्मिक संक्रमण मोठ्या प्रमाणावर झाले याचा परिणाम म्हणून या भूप्रदेशावर हिंदू, जैन, ख्रिश्चन, इस्लाम इ. धार्मिक स्थळे आहेत. यामुळे आज ही सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांवर वारकरी संप्रदाय, भक्ती चळवळ, शैव संप्रदाय, वैष्णव संप्रदाय इ. च्या तत्वज्ञानाचे गुण, वैशिष्ट्यांचा प्रभाव टिकून आहे. सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे पर्यटनासाठी महत्त्वाची असल्याने भारतातून आणि महाराष्ट्रातून लाखोंच्या संख्येने पर्यटक येत आहेत. सोलापूर शहराचे ग्रामदैवत श्री सिध्देश्वर मंदिर, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थांचे मंदिर आणि वारकरी संप्रदयाचे आद्यपीठ श्री क्षेत्र पंढरपूरचे विठ्ठल मंदिर यांच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. या समवेत सोलापूर जिल्हातच करमाळ्याची-कमलाई मंदिर, माढ्याची-माढेश्वरी मंदिर, वेळापूरचे-अर्धनारीनटेश्वर मंदिर, कुडलसंगमचे-महादेव वहरीहरेश्वर मंदिर, दहिगावचे-जैनमंदीर, माचणूरचे-सिध्देश्वर मंदिर, वडवळचे-नागनाथ मंदिर, अशी अनेक पर्यटन स्थळे सोलापूर जिल्ह्यात आहेत. या धार्मिक स्थळामुळे सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनात वाढ होऊन

याचा परिणाम सोलापूर जिल्ह्याच्या आर्थिक विकासावर होत आहे.सोबतच भारतीय संस्कृती, स्थापत्य, कला, शिल्पकला, तत्त्वज्ञान, मूर्तीकला यांच्या संर्वधनासाठी ही धार्मिक स्थळे कारणीभूत ठरत आहेत.

➢ **संशोधनाची उद्दीष्ट्ये :-**

सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाची माहिती समाज व वाचक यांच्यापुढे यावी हा प्रस्तुत प्रबंधाचा उद्देश आहे.प्रबंधाची उद्दीष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

१) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे.
२) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाची ठळक वैशिष्ट्ये अधोरेखित करणे.
३) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
४) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाचा येथील आर्थिक परिस्थतीवर झालेला परिणाम अभ्यासणे.
५) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनाचा सामाजिक जीवनावर पडलेला प्रभाव अधोरेखित करणे.
६) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळांना पर्यटनाच्या दृष्टीकोनातून प्रसिध्दी मिळवून देणे.

➢ **संशोधनाची गृहितके :-**

संशोधनाची गृहितके पुढीलप्रमाणे :-

१) सोलापूर जिल्ह्यास धार्मिक वारसा लाभलेला आहे.
२) सोलापूर जिल्ह्यात विविध धर्मांची धार्मिक स्थळे आहेत.
३) सोलापूर जिल्ह्याच्या सांस्कृतीक विकासात धार्मिक स्थळांचा प्रभाव आहे.
४) सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक जीवनावर धार्मिक तीर्थस्थळांचा प्रभाव आहे.
५) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळे पर्यटनक्षेत्र म्हणून मान्यता प्राप्त आहेत.
६) सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळामधून येथील शिल्पकला, मूर्तीकला, मंदिरकला इ. माहिती मिळते.

➢ व्याप्ती व महत्त्व :-

सदरचे संशोधन हे सोलापूर जिल्ह्याशी संबंधीत असून संशोधनात सोलापूर जिल्ह्यातील असलेल्या धार्मिक स्थळांचा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात येईल. सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांचे धार्मिक व सामाजिक जीवनातील महत्त्व त्याचबरोबर या स्थळांचा जिल्ह्यातील आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम अभ्यासणे. सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक स्थळांची स्थापत्य कला, मुर्तीकला त्याचबरोबर त्या ठिकाणी साजरे केले जाणारे सण, उत्सव यात्रा याचा अभ्यास करण्यात येईल. हे संशोधनाचे महत्त्व आहे.

➢ संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनाचा हेतू साध्य करण्यासाठी आणि दिलेली गृहितके सिध्द करण्यासाठी येथे ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल. विशेषत: लिखित व अलिखित साधनाचा ही आधार संशोधनासाठी घेण्यात येईल. तसेच सर्वेक्षण पध्दती, निरिक्षण पध्दती, मुलाखत पध्दती याचा उपयोग संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

➢ माहिती संकलन:-

प्रस्तुत संशोधनात या अभ्यास विषयाशी संबंधित प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात येईल. महाराष्ट्र राज्याचे गॅझेटिअर तसेच सोलापूर जिल्ह्याचे गॅझेटिअर, प्रत्यक्ष मुलाखतीतून मिळालेली माहिती, तीर्थक्षेत्रावर आढळलेले शिलालेख, मंदिरे, मुर्त्या, तीर्थक्षेत्राच्या संस्थेकडे असलेली कागदपत्रे याच्या आधारे माहिती मिळविली जाईल. तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी प्रकाशित केलेली पुस्तके, साहित्य, अहवाल, लेख, चरित्रे, तीर्थक्षेत्राविषयी असलेली सामाजिक दंतकथा, आख्यायिका इ. च्या आधारे माहितीचे संकलन करण्यात येईल.

➢ माहिती विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधनासाठी वरील सुचवण्यात आलेल्या संशोधन पध्दतींचा वापर करुन जी माहिती संकलीत करण्यात येईल त्या माहितीच्या आधारानेच संबंधित विषयाचे विश्लेषण करण्यात येईल.

संकलित प्रबंधाची प्रकरण विभागणी

प्रकरण पहिले	:	प्रास्ताविक
प्रकरणे दुसरे	:	पर्यटन संकल्पना व स्वरुप
प्रकरण तिसरे	:	सोलापूर जिल्ह्यातील हिंदू धार्मिक पर्यटन स्थळे
प्रकरण चौथे	:	सोलापूर जिल्ह्यातील इतर धार्मिक पर्यटन स्थळे
प्रकरण पाचवे	:	धार्मिक पर्यटनाचा सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर झालेला परिणाम
प्रकरण सहावे	:	धार्मिक पर्यटनाचा सोलापूर जिल्ह्याच्या आर्थिक जीवनावर झालेला परिणाम
प्रकरण सातवे	:	उपसंहार

प्रकरण पहिले
प्रास्ताविक

➢ सोलापूरची भौगोलिक परिस्थिती :-

महाराष्ट्रामधील एक महत्त्वपुर्ण जिल्हा म्हणून सोलापूरचे महत्त्व आहे.सोलापूर हा आधुनिक काळात क्षेत्रफळाच्या दृष्टीने मोठा जिल्हा असला तरी मध्ययुगीन काळात मात्र हा जिल्हा लहानच होता. सोलापूर १७°१० आणि १८°३२ उत्तर अक्षांशावर आणि ७४°४२ ७६°१५ पूर्व रेखांशावर वसलेले आहे. सोलापूर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १४८४४.६ चौरस कि.मी. आहे. सोलापूरातील सरासरी पर्जन्यमान ५४५.४ मि.मि. (महाराष्ट्रातील सर्वात कमी) आहे. जिल्ह्याची लोकसंख्या ३८,४८,५४३ (इ.स २००१) आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस अहमदनगर व उस्मानाबाद पुर्वेला उस्मानाबाद, दक्षिणेस सांगली व विजापूर जिल्हा व (कर्नाटक) तर पश्चिमेस सांगली, सातारा व पुणे हे जिल्हे आहेत.जिल्ह्याच्या उत्तर, ईशान्य व पुर्व भागात बालाघाटच्या डोंगररांगा तर पश्चिम व नैऋत्य भागांत महादेवाचे डोंगर आहे.इतर भाग सपाट, पठारी आहे.या जिल्ह्याचे हवामान सर्वसाधारणपणे उष्ण व कोरडे आहे तसेच उन्हाळ्यात कमाल तापमान ४० ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत जाते. जिल्ह्यातून सीना, नीरा, भीमा, भोगावती, माण या छोट्या-मोठ्या नद्या वाहतात.सोलापूर जिल्हाच्या सीमेवर उजनी धरण बांधलेले असून त्यातून सोलापूर शहरासह पश्चिम व मध्य भागात पाणीपुरवठा केला जातो.या धारणाच्या परिसरात फ्लेमिंगो पक्षी आढळतात.

अशा पध्दतीने सोलापूर जिल्ह्याची राजकिय, सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण दुसरे
पर्यटन संकल्पना व स्वरुप

➢ प्रस्तावना :-

एकविसाव्या शतकात सामाजिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर दुरगामी परिणाम करणारी आर्थिक क्रिया म्हणजे पर्यटन होय. अनादी काळापासून मानवाचा प्रवास सुरु असून अनभिज्ञ ठिकाणाचा ठाव घेण्याची ईर्ष्या व प्रवास यांनी मानवी मनास मोहीत केलेले आहे. प्राचीन मानव अजाणतेपणाने प्रवास करीत असे.२१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर असलेला मानव आवड, कुतुहल व संशोधन म्हणून प्रवास करतो.पर्यटनामुळे देशाला परकिय चलन प्राप्त होते.भिन्न विभिन्न समाजातील देशातील लोकांचा संपर्क पर्यटनामुळे निर्माण होतो.राष्ट्रीय एकात्मतेस अत्यंत पोषक अशी वैचारिक देवाण-घेवाण पर्यटनामुळे होते.त्यामुळे आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढण्यासाठी मदत होते.

➢ पर्यटन म्हणजे काय :-

आज जगात पर्यटनाला महत्त्व प्राप्त झाले आहे. पर्यटन या शब्दास इंग्रजीत Tourism असे म्हणतात. Tourism हा शब्द Tour (प्रवास) या शब्दापासून आणि Tour हा शब्द लॅटिन भाषेतील Tornos या शब्दांपासून तयार झाला. Tourns या शब्दापासून पुढे Tourism शब्द तयार झाला. Tourism या शब्दाचा अर्थ Journey म्हणजे प्रवास असा होतो.हा प्रवास जागेचा शोध घेणे, शिक्षण घेणे, अभ्यास करणे, व्यवसाय आणि आनंदप्राप्ती साठी होत असतो.यामध्ये मानवाने ज्या विषयी ऐकले आहे ते पाहण्याची इच्छा अंतर्भूत असते.

➢ पर्यटन : व्याख्या :-

अनेक अभ्यासकांनी पर्यटनाच्या विविध व्याख्या केलेल्या आहेत त्या खालील प्रमाणे.

१) जोस ॲरिलागा :-

सायकलवरुन फिरणे, गिर्यारोहण करणे, तळ ठोकणे, नौकाविहार करणे, खेळ इत्यादीसाठी भ्रमंती करणे म्हणजे पर्यटन होय.

२) हरमन श्युल्लर्ड :-

परदेशातून एखाद्या मानवाने एखाद्या देशात, प्रदेशात किंवा शहरात आगम, वास्तव्य भ्रमंती व तिथून पुन्हा स्वदेशी जाणे पर्यटन होय.

३) डॉ. जेभिड्विन :-

पर्यटन हे एक सामाजिक आंदोलन असून त्यामध्ये आराम, विनोद, क्रीडा व सांस्कृतिक गरजांची पुर्तता होते.

अशा विविध व्याख्या पर्यटना संबंधी केलेल्या आहेत त्याचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येईल.

तसेच पर्यटनाची ऐतिहासिकता, पर्यटनाची उद्दीष्ट्ये, पर्यटनाचे स्वरुप, पर्यटनाची व्याप्ती, पर्यटन विकास, पर्यटनात इतिहासाची भूमिका, शासन आणि पर्यटन या घटकांचा अभ्यास या संबंधी प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे

सोलापूर जिल्ह्यातील हिंदू धार्मिक पर्यटन स्थळे

सोलापूर जिल्हा महाराष्ट्रातील एक प्रमुख जिल्हा असून तो राज्याच्या दक्षिण भागात आहे.धार्मिक व अध्यात्मिक दृष्टीकोनातून सोलापूर जिल्हा राज्यात महत्त्वाचा ठरतो. जिल्ह्यात पंढरपूर, अक्कलकोट, बार्शी, करमाळा, वेळापूर, सोलापूर इ. ठिकाणांची देवस्थाने प्रसिध्द आहे त्यांचा अभ्यास या प्रकरणात खालीलप्रमाणे करण्यात येईल.

१) श्री सिध्देश्वर मंदिर : सोलापूर

सोलापूर जिल्ह्याचे मुख्य शहर या शहरापासुन पंढरपूर, मंगळवेढा, तुळजापूर

अक्कलकोट ही तीर्थक्षेत्रे जवळ आहेत.श्री सिध्देश्वर हे सोलापूरचे ग्रामदैवत आहे.महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रमधील भाविकांचे श्रध्दास्थान आहे.हे मंदिर सिध्देश्वर तलावाच्या मध्यभागी वसलेले आहे.श्री सिध्देश्वर महाराज या मंदिरात ध्यान-धारणा करीत असत दरवर्षी १४ ते २० जानेवारी या संक्रांतीच्या काळात या मंदिरात भव्य-दिव्य अशी गड्डा यात्रा भरते.

१४ जानेवारीला सिध्देश्वर महाराजाचा विवाह सोहळा पार पडतो.त्याला अक्षता सोहळा ही म्हणतात.तसेच ७ नंदिध्वजांची मिरवणूक निघते.१५ जानेवारीला फटाक्यांची आतिषबाजी केली जाते याला दारुकाम सोहळा म्हणतात.

२) श्री स्वामी समर्थ मंदिर : अक्कलकोट

सोलापूर पासून ३५ किमी अंतरावर हे क्षेत्र वसलेले आहे .स्वामी हे श्री दत्तात्रयांचे अवतार मनले जातात.अशी त्यांची ख्याती आहे."भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे" या त्यांच्या उद्देशाने भक्तांना परमेश्वर आपल्या पाठीशी उभा आहे .असा विश्वास उत्पन्न होतो.दर गुरुवारी व पौर्णिमेला येथे भाविकांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी होते.कर्नाटक व महाराष्ट्र राज्यातून मोठ्या संख्येने भाविक येथे भेट देण्यासाठी येतात येथील अन्नछत्र वर्षभर विनामुल्य चालू असते.

३) श्री विठ्ठल मंदिर : पंढरपूर

भारताची दक्षिण काशी म्हणून पंढरपूर क्षेत्र प्रसिध्द आहे.आषाढी व कार्तिकी एकादशीला लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनाला येतात.येथे विठ्ठल व रुक्मिणी यांचे वेगवेगळी मंदिरे आहेत.विठ्ठल मंदिर हे शिल्पकलेचा उत्तम नमुना ही मानले जाते.मंदिराच्या गाभाऱ्यांत कोट्यावधी भक्तांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी पांडूरंगाची मुर्ती आहे.

४) श्री. भगवंत मंदिर : बार्शी

प्राचीन काळी बार्शीची ओळख भगवंताची बार्शी असी होती. भगवंत मंदिरासाठी हे शहर प्रसिध्द आहे. हे मंदिर विष्णु देवांचे आहे. १२४५ साली हे मंदिर हेमाडपंथी शैलीने बांधण्यात आले. या मंदिरास चारी दिशने प्रवेशाव्दारे आहे. मुख्यव्दार पुर्वमुखी आहे. गाभाऱ्यात गरुडखांब आहे. चैत्र, मार्गशीष, आषाढी व कार्तिकी एकादशीस गरुडस्वार भगवंताची मिरवणुक शहरातून काढली जाते.

५) श्री. सिध्देश्वर मंदिर : माचणूर

माचणूर या गावी भिमानदीच्या काठावर श्री. सिध्देश्वराचे प्राचीन मंदिर आहे. मंदिराचे बांधकाम दगडी असून मोठ्या शिळांचा वापर बांधकामात करण्यात आला आहे. प्रथम

प्रवेशव्दाराच्या आत उभे राहिले असता मंदिर परिसर व उजव्या बाजूला भीमानदी असे सुंदर दृश्य पहावयास मिळते. प्रवेशव्दारातून प्रांगणात प्रवेश करताना दोन्ही अंगाना पहारेकऱ्यांच्या देवड्या दिसतात. डाव्या हाताला शंकराचे लहान मंदिर आहे. दुसऱ्या प्रवेश व्दाराच्या दोन्ही बाजुंना भिंतीत विरगळ बसलेले आहेत. मंदिराच्या भोवती तटबंदी उभारली आहे. मंदिराच्या समोर तीन फुट उंचीचा भव्य नंदी आहे. गाभाऱ्यात महादेवाची पिंड आहे. त्यावरती चांदीचा मुखवटा ही आहे. मंदिराला लागून भव्य असा घाट बांधण्यात आला आहे. ह्या घाटाच्या पन्नास पायऱ्या उतरुन खाली गेले की, नदी पात्रातच मध्यभागी जटाशंकाराचे छोटे मंदिर आहे. महाशिवरात्रीला येथे मोठे जत्रा भरते.

६) श्री. अर्धनारी नटेश्वर मंदिर : वेळापूर

माळशिरस तालुक्यातील वेळापूर या गावी अर्धनारी नटेश्वर मंदिर आहे. वेळापूरचे ग्रामदैवत म्हणून अर्धनारी नटेश्वराची ओळख आहे. या मंदिराच्या प्रांगणात मोठी दिपमाळ आहे. या दिपमाळेच्या शेजारीच बारव बांधलेली आहे. या बारवाला सर्वबाजुंनी पाण्याचे झरे असल्याने उन्हाळ्यात ही पाणी असते. मंदिराबाहेर चौकोनी उंच आसनावर दगडी मंडपामध्ये नंदी आहे. नदीच्या दोन्ही शिंगामधून मंदिराच्या कळसाचे दर्शन होते. अर्धनारी नटेश्वर मंदिरात प्रवेश केल्यानंतर दक्षिणमुख सिध्दीविनायकाची मुर्ती आहे. तसेच सप्तमातृका ही पाहावयास मिळतात. गाभाऱ्यात शिवपार्वतीची सुरेख अशी मुर्ती आहे. हे मंदिर शिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

७) श्री. कमलाईदेवी मंदिर : करमाळा

करमाळा हे निंबाळकर घराण्याच्या जहागिरीचे गाव रंभाजीराव हे तुळजापूरच्या तुळजाभवानी देवीचे परमभक्त असल्याने त्याने करमाळा येथे कमलाई देवीचे मंदिर बांधले या मंदिराच्या बांधणीत हिंदु व मोगल संस्कृती यांची मिश्रशैली आढळते. रंभाजीने हे मंदिर हेमाडपंथी वास्तुशैली पध्दतीने बाधंले रंभाजीरावाने दक्षिणात्य पध्दतीने मंदिराची गोपुरे व

शिल्पकला घडवली. मुख्य गाभाऱ्यात कमलाई देवीची मुर्ती आहे. देवी सिंहावर आरुढ असून महिषासुराचे मर्दन करत आहे. असी हि मुर्ती आहे. गाभाऱ्यावरील शिखर सहा स्तरांचे आहे. त्यावर दाक्षिणात्य पध्दतीची देवदेवतांची सुरेख शिल्पे कोरलेली आहेत.

८) श्री हरिहरेश्वर मंदिर : हत्तरसंग कुडल

भीमा-सीना या नद्यांच्या संगमावर हे तीर्थक्षेत्र वसलेले आहे. या ठिकाणी झालेल्या पुरातत्त्वीय संशोधनामुळे हे आज जिल्ह्यातील प्रमुख पर्यटन स्थळ बनले आहे. या उत्खननात जगातील एकमेव असे दुर्मीळ शिवलिंग सापडले आहे. या ४ फुटी शिवलिंगावर शिवाची ३५९ मुखे व अन्य मुर्ती कोरल्या आहेत. महाशिवरात्रीला सुर्येदयाच्या वेळी अनेक दरवाजे ओलांडून सुर्याची किरणे शिवलिंगावर पडतात.

वरील धार्मिक स्थळांचा अभ्यास पर्यटनाच्या दृष्टीकोनातून करण्यात येणार आहे. हे पर्यटन, जत्रा, यात्रा, सण, उत्सव, समारंभ इ. च्या माध्यमातून होत आहे. याचा परिणाम

त्या-त्या शहरातील, गावातील, अर्थव्यवस्थेवर होत आहे. त्याचप्रमाणे अकलुजची - अकलाईदेवी मंदिर, माढ्याची-माढेश्वरी दूवीचे मंदिर, मार्डीची-भवानीदेवी मंदिर, वडवळचे-नागनाथ मंदिर, केमचे-उत्तरेश्वर मंदिर, अरणचे-सावतामाळी मंदिर, यांचाही अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण चौथे

सोलापूर जिल्ह्यातील इतर धार्मिक पर्यटन स्थळे

१) तीर्थंकर भगवान महावीर मंदिर : दहिगाव

माळशिरस तालुक्यातील दहिगाव हे जैनांचे भगवान महावीर व ब्रम्हमहती शांती सागर महाराज यांच्या क्षेत्रामुळे प्रसिध्द आहे. या गावी २०० वर्षापूर्वीचे महावीरांचे मंदिर आहे हे मंदिर गर्भगृह सभामंडपांनी युक्त आहे. गर्भगृहामध्ये भगवान महावीर यांची मुर्ती आहे. याच गावी ब्रम्हमहती सागर यांनी समाधी घेतली ब्रम्हमहती यांनी या भागातील जैन धर्मियात जागृती निर्माण केली आणि महावीरांचे मंदिर ही बांधले.

२) सुफीसंत हजरत ख्वाजा हाजी सैफुल मुलूक चिस्ती : हैद्रा

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा हे ठिकाण आहे. हैद्रा या ठिकाणी सुफीसंत हजरत ख्वाजा सैफुल-मुलूक चिस्ती याचा दर्गा आहे. या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी सर्व धर्माचे भाविक येतात. मनापासुन केलेली प्रार्थना या ठिकाणी पूर्ण होते. अशी भाविकांची

श्रध्दा आहे त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत आहे. तसेच लऊळचे-लुंडाबाब दर्गा, बोरामणीचे-दावलमलिक दर्गा, यांचाही अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण पाचवे

धार्मिक पर्यटनाचा सोलापूर जिल्ह्याच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर झालेला परिणाम

➢ **सामाजिक विकासावर झालेला परिणाम :-**

सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनामुळे लोकांच्या जीवनपध्दतीमध्ये परिवर्तन घडलेले दिसून येते. पर्यटनाच्या निमित्ताने आलेल्या लोकांचा स्थानिक लोकांची जीवनपध्दती, संस्कृती यांच्याशी संबंध येतो. पर्यटक म्हणून आलेल्या लोकांवर याचा प्रभाव पडतो व त्यांच्या जीवनपध्दतीवर याचा परिणाम झालेला दिसून येतो. उदा. हैद्रा हे मुस्लिम देवस्थान असले तरी हिंदू बोललेले नवस फेडण्यासाठी त्या उरूसामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. त्याचप्रमाणे सोलापूरातील प्रसिध्द गड्डा यात्रेत सर्व धर्मातील लोक मोठ्या आनंदाने सहभागी होऊन एकात्मता व समानतेचे दर्शन घडवितात. बाराबंदी हा पोशाख सर्व समाजातील लोक परिधान करतात. हे सामाजिक ऐक्याचे प्रतिकच मानावे लागेल. अशा पध्दतीने धार्मिक पर्यटनाचा सामाजिक घटकावर परिणाम होत आहे. याचा अभ्यास प्रस्तूत प्रकरणात करण्यात येणार आहे.

➢ **सांस्कृतिक विकासावर झालेला परिणाम :-**

सोलापूर जिल्ह्यातील पर्यटनाचा आर्थिक व सामाजिक विकासाप्रमाणेच सांस्कृतिक विकासावर परिणाम झालेला दिसून येतो. सोलापूर जिल्ह्यात हिंदू, इस्लाम, बौध्द,जैन, लिंगायत इ. धर्माचे लोक राहतात. त्यामुळे येथील लोकांवर एकमेकांच्या संस्कृतीचा प्रभाव पडलेला दिसतो. साळी समाजातील पोशाम्मा देवीचा स्विकार व त्यांच्या संस्कृतीचा स्विकार इतर समाजाने केला. त्यामुळे या देवीच्या यात्रेत सोलापूर जिल्ह्यातील सर्व समाजातील लोक भाग घेतात. त्याचप्रमाणे सोलापूर जिल्ह्यात असणारे पाचपीर (अनगर), यल्लमादेवी (कासेगाव), विठ्ठल (पंढरपूर), स्वामी समर्थ (अक्कलकोट) इ. धार्मिक स्थळांना वेगवेगळ्या

भागातून लोक भेटी देतात. त्यांच्या संस्कृतीचा स्थानिक लोकांशी संबंध आल्याने मुळच्या संस्कृतीवर परिणाम झालेला दिसून येतो. याचा अभ्यास प्रस्तूत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे

धार्मिक पर्यटनाचा सोलापूर जिल्ह्याच्या आर्थिक जीवनावर झालेला परिणाम

पर्यटनामुळे नैसर्गिक व मानवी वैशिष्ट्यांवर परिणाम होत असतात. विविध पर्यटनस्थळी त्या पर्यटन परिसरांतील, निकटवर्ती ठिकाणी असलेल्या निसर्गावर तेथील मानवी समुहांच्या स्वभावात व संस्कृतीत दीर्घकालीन आणि दूरगामी परिणाम पर्यटकांच्या

वागणूकीमुळे, त्यांच्या संस्कृतीमुळे, प्राप्त होणाऱ्या पैशामुळे कळत नकळत घडून येत असतात. मानवाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रावर पर्यटनाचा परिणाम होत असतो.

- **आर्थिक विकासावर झालेला परिणाम :-**

पर्यटन उद्योग हा कमी भांडवलात जास्त नफा मिळवून देणारा उद्योग आहे.सोलापूर जिल्ह्यात अनेक आकर्षक पर्यटनस्थळे असल्यामुळे अनेक पर्यटक या ठिकाणी येत आहेत.या पर्यटकांच्या येण्याने अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. आज सुशिक्षित बेकार

तरुणांना पर्यटनामुळे कामाच्या नवीन संधी मिळत आहेत.ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारत आहे.पराराष्ट्रातून ही पर्यटक सोलापूर जिल्ह्यात येतात त्यामुळे जिल्ह्यास परकीय चलन उपलब्ध होत आहे.एखादा पर्यटक या स्थळांना भेट दिल्यानंतर तेथील अनेक वस्तु खरेदी करतात त्यामुळे त्या त्या भागातील स्थानिक उद्योग विकसित होत आहेत.तसेच हस्तकलेचे उद्योग निर्माण झाले आहेत.पर्यटन व्यवसायातून अनेक प्रकारे महसूल प्राप्त होतो.अशा विविध प्रकारे सोलापूर जिल्ह्यातील विकासात पर्यटन आपली भूमिका पार पाडत आहे.

प्रकरण सातवे

उपसंहार

प्रस्तुत प्रकरणात प्रास्ताविक पर्यटनाची ओळख, सोलापूर जिल्हातील धार्मिक पर्यटनस्थळे, सोलापूर जिल्ह्यातील धार्मिक पर्यटन स्थळांचा झालेला परिणाम या सर्व प्रकरणांचा अभ्यास करताना हाती आलेले निष्कर्ष मांडले जाणार आहे.

संदर्भ ग्रंथ सुची

१) Bhatia A.K. :- "Tourism Development Principals and Practice", Sterling Publisher Pvt. Ltd.

२) Kumar Akshay :- "Tourism Management", Commonwealth publisher New Delhi, 1997.

३) साने र.य. :- "महाराष्ट्र पर्यटन कोश", विद्या विकास मंडळ, नागपूर, प्रथमावृत्ती, १९९८

४) देशमुख रा.नी. :- "आपला सोलापूर जिल्हा", कल्पना प्रकाशन, नांदेड.

५) शर्मा हरिदत्त :- "पर्यटन कोश", सुबोध पॉकेट बुक्स, प्रकाशन.

६) देशमुख गोपाळ :- "सोलापूर जिल्ह्याचा इतिहास मराठे कालखंड", रेवू प्रकाशन, पंढरपूर.

७) गुप्ता शिवसहाय :- "भारत के सांस्कृतिक एवं धार्मिक पर्यटन स्थळ", मोहित बुक्स इन्टरनेशनल प्रकाशन, नई दिल्ली, २०१०

८) घाडगे प्रकाश :- " चला पर्यटनाला", प्रतिक पब्लिकेशन ब्रम्हपुरी, मिरज

९) सहस्त्रबुध्दे पु.ग. :- "महाराष्ट्र संस्कृती", कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजय नगर, पुणे.

१०) प्रा. कुलकर्णी शिल्पा:- "महाराष्ट्रातील पर्यटन", डायमंड पब्लिकेशन. पुणे.

११) दाण्डेकर गोपाल :- "महाराष्ट्रदर्शन", मृणमयी प्रकाशन पुणे.

१२) कुलकर्णी दत्ता :- "महाराष्ट्रातील पर्यटनस्थळे"

१३) कुलकर्णी दत्ता :- "महाराष्ट्रातील धार्मिक स्थळे"

१४) खरे ग.ह. :- "महाराष्ट्राची चार दैवते", भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

१५) गॅझिटीयर ऑफ इंडिया, महाराष्ट्र स्टेट, सोलापूर डिस्ट्रीक्ट १९७७.

१६) शर्मा देवेश :- "धार्मिक पर्यटन", मोहित बुक्स इन्टरनेशनल प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१०.

१७) भारव्दाज डॉ. संजयकांत :- "भारत मे पर्यटन विकास", हेमन्त पब्लिकेशन हाऊस प्रकाशन, प्रथमसंकरण २०१३.

१८) डॉ. साखरे विजया :- "ऐतिहासिक पर्यटन", अक्षरलेण प्रकाशन, प्रथम आवृत्ती जुलै २०१२.

१९) डॉ. शिंदे एस.बी. :- "पर्यटन भूगोल", फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती सप्टेंबर २०११.

२०) डॉ. घारपुरे विठ्ठल :- "पर्यटन भूगोल", मनोहर पिंपळापुरे पिंपळापुर ॲण्ड कं. पब्लिकेशन्स, पहिली आवृत्ती जुन २००१.

२१)सांगळे शैलजा :- "पर्यटन भूगोल", डायमंड पब्लिकेशन.

२२) पाटील तानाजी :- "माझे पर्यटन उद्‌बोधन आणि रंजन", सांज प्रकाशन, सोलापूर.

मार्गदर्शक
प्रा. डॉ. आर. एस. कांबळे
श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय,
लातूर.

संशोधक
लक्ष्मण दत्तात्रय खंडागळे
मु.पो. उळे, ता.द.सोलापूर
जि. सोलापूर.